# स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्रातील पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास

प्रस्तुत निबंध लिहिताना माझी भूमिका तत्त्वज्ञानाच्या इतिहासाच्या अभ्यासकाची आहे. त्यामुळे इतिहासाची मांडणी करताना घटनांची निवड करण्याचे स्वातंत्र्य मी बजावणार आहे. तसेच तत्त्वज्ञानाच्या इतिहासाचा अभ्यास त्याला समाजातील तत्कालीन अन्य घडामोडींपासून अलग करून करता येणे शक्य, सोईचे व प्रसंगी उपयुक्तही असले तरी नियोजित चर्चासत्राचा आवाका लक्षात घेतला असता, तसे करण्यापेक्षा तो व्यापक समाजेतिहासाच्या चौकटीत करणे मी अधिक औचित्यपूर्ण मानतो.

महाराष्ट्रात इंग्रजी राजवट येण्यापूर्वी येथे पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास मुळीच नव्हता; उलट एकंदरीत पाश्चात्य जगतासंबंधी भ्रामक व विचित्र कल्पना प्रचलित होत्या, हे वेगळे सांगायची गरज नाही. पाश्चात्य विद्यांच्या अभ्यासाची सुरुवात महाराष्ट्राअगोदर बंगालमध्ये झाली होती हे मात्र येथे नमूद केले पाहिजे. शिवाय येथील इंग्रजी राजवटीमुळे मुख्यत्वे इंग्रजी भाषेचा फैलाव झाला असल्यामुळे इंग्रजीशिवाय अन्य पाश्चात्य भाषेमध्ये जे ज्ञान होते ते येथे बहुतांशी इंग्रजीतूनच आले असणार हे उघड आहे.

एकोणिसाव्या शतकातील सहाव्या दशकाच्या पूर्वार्धात कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी सॉक्रेटिसचे चरित्र लिहले. त्यात सॉक्रेटिसच्या तत्त्वज्ञानाचा जो काही भाग आला असेल तो महाराष्ट्रातील पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा ओनामा मानण्यास हरकत नाही. लवकरच म्हणजे १८६४ साली या पुस्तकाची दुसरी आवृत्तीही निघाली.

सॉक्रेटिसने महाराष्ट्रात बऱ्यापैकी मूळ धरले. दि. २८ जानेवारी १८६५ रोजी अहमदनगरला लोकहितवादी गोपाळराव हरि देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या ज्ञानेच्छु सभेत सॉक्रेटिससंबंधी भाषणे व चर्चा झाल्याचे वृत्त पंधरा मार्चच्या ज्ञानोदयाने छापले आहे. सदर सभेत सॉक्रेटिस व तुकाराम यांची तुलना करण्यात आली लोकहितवादींना ही तुलना पटली नाही. ते असे म्हणाले की "सॉक्रेटिस हा तत्त्वज्ञानी ( फिलॉसॉफर ) होता पण तुकाराम नव्हता. तो भक्ति-मार्गी संत होता. **या देशात तत्त्वज्ञानी म्हणून फारसे झालेच नाहीत** "

या देशात तत्त्वविचार झालाच नाही असे लोकहितवादींना म्हणायचे नसावे. धर्म आणि तत्त्वज्ञान यांच्यात जितकी फारकत पाश्चात्य देशांत दिसून येते तितकी भारतात दिसत नाही. ( कदाचित प्राचीन काळी असेल, परंतु नंतरच्या काळात राहिली नाही, हे नक्की. ) वेगळ्या शब्दांत मॅक्समुल्लरने हेच मत व्यक्त केले व लोकमान्य टिळकांनी त्याला सहर्ष संमती दिली. मॅक्समुल्लर म्हणतो, " Whether religion leads to philosophy or philosophy to religion, in India the two are inseparable. "[1] टिळकांच्या मते धर्म व तत्त्वज्ञान यांच्यामधील भेद काल्पनिक आहे.[2]

टिळकांचे मत बरोबर की चूक हा प्रश्न बाजूला ठेऊ. ज्या प्रार्थना समाजाचे अध्वर्यु हे महाराष्ट्रातील पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे प्रारंभीचे अभ्यासक होत ती प्रार्थना समाजाची चळवळ एक धार्मिक चळवळ म्हणूनच निघाली हे मात्र सत्य आहे. लोक-हितवादी प्रार्थनासमाजाशी संबद्ध होतेच. पण मला अभिप्रेत आहेत ते न्या. महा-देव गोविंद रानडे आणि सर रामकृष्ण भांडारकर. भांडारकरांचा दृष्टिकोन हा प्राधान्याने प्राच्यविद्यावेत्याचा होता हे लक्षात ठेवले पाहिजे. अर्थात त्यामुळेच त्यांचा जर्मन भाषेशी प्रत्यक्ष संबंध आला व सांख्य तत्त्वज्ञानाचे जर्मन चिद्वादी तत्त्वज्ञ फिश्ते यांच्या विचाराशी साम्य आहे असे ते १८७० मध्ये म्हणू शकले.[3] भांडारकर व रानडे या दोघांचीही तत्त्वमीमांसा धर्मकेंद्रित होती. भांडारकरांनी विल्यम जेम्स या अमेरिकन उपयुक्ततावाद्याच्या धर्मविषयक मतांचा उहापोह केलेला आढळतो.[4]

न्या. रानडे, जॉन लॉक, थॉमस रीड, बार्क्ले, बटलर, फ्रेझर या तत्त्व-वेत्त्यांच्या विचारांशी परिचित होते असे त्यांच्या लिखाणावरून दिसून येते. विशेषत: ज्या " Philosophy of Thiem " या व्याख्यानावर टिळकांनी ' केसरी ' मधून तीन अग्रलेख लिहून टीका केलेली होती ते व्याख्यान फ्रेझरवरूनच घेतलेले होते.[5]

प्रार्थनासमाजिस्ट आणि आगरकरपंथीय सुधारणावादी यांच्यातील आंतरिक संबंधांचा विचार अत्यंत जरुरीचा आहे. हर्बर्ट स्पेन्सरपासून आगरकरादींनी अज्ञेय-वाद घेतला. स्पेन्सरवर अज्ञेयवादाच्यापुरती हॅमिल्टनची छाप होती. हॅमिल्टनच्या अज्ञेयवादाशी रानड्यांचा परिचय होता. पण त्यांना अज्ञेयवाद स्वीकार्य वाटला

नाही. उलट डेक्कन कॉलेजच्या प्रो. सेल्बी यांनी बटलरवरील पुस्तकात मांडलेल्या अज्ञेयवादाबद्दल रानड्यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली होती.[6]

प्रार्थनासमाजिस्ट, सुधारणावादी आणि राजकारणातील मवाळ अनेकदा एकत्र दिसतात. सुधारकांची प्रेरणा ही मुख्यत्वे मिल आणि स्पेन्सर ही आहे. सुधारकांची सुधारणाविषयक बरीचशी मते प्रार्थनासमाजिस्टांना मान्य होती. पण त्यांची प्रेरणा मिल व स्पेन्सर नसून अमेरिकन विचारवंत थिओडार पार्कर ही होती. पार्करने स्त्रियांचे हक्क, शैक्षणिक सुधारणा व धार्मिक उदारता यांचा पुरस्कार केलेला होता.[7] प्रार्थना समाजाच्या प्रारंभीच्या काळात उपासनेच्या वेळी प्रार्थनांच्या बरोबर पार्करच्या लिखाणातील वेचेही वाचण्यात येत असत.[8]

ज्या कालखंडाचा विचार या निबंधात सध्या प्रस्तुत आहे, तो कालखंडच मुळी समाजाच्या व राष्ट्राच्या भवितव्यासंबंधी चिंता करण्याचा आणि शक्यतोवर तदनुषंगाने कृती करण्याचाही होता. केवळ तत्त्वचिंतनासाठी लागणारे स्वास्थ्यही तेव्हा नव्हते. तेव्हा तर्कशास्त्र, सत्ताशास्त्र, असल्या प्रत्यक्ष जीवनाशी फारसा संबंध नसलेल्या शाखांपेक्षा सामाजिक, राजकीय व नैतिक तत्त्वज्ञानाकडे तत्कालीनांचा कल अधिक असल्यास नवल नाही. ( फुल्यांचे लक्ष थॉमस पेनच्या राजनैतिक निबंधांकडे गेले ते बहुधा यामुळेच ) प्रार्थनासमाजिस्टांना मात्र याशिवाय ईश्वरशास्त्रात व धर्माच्या तत्त्वज्ञानातही स्वारस्य होते ते त्यांच्या स्वतःच्या अंतःप्रेरणेमुळे.

प्रार्थनासमाजिस्टांकडून आपण सुधारणावाद्यांकडे वळतो तेव्हा त्यांच्या विचारसरणीचे पाश्चात्य मूलाधार मिल आणि स्पेन्सर आहेत, हे ध्यानात यायला काही अडचण येत नाही. मिलचा उपयुक्ततावाद आणि स्पेन्सरचा उत्क्रांतिवाद व अज्ञेयवाद हे आगरकरांच्या लिखाणातून ठायीठायी डोकावतात. याशिवाय रूसो, व्हाल्टेअर, दिदेरो या फ्रेंच तत्वज्ञांचा परिचय त्यांना मोर्लेसाहेबांच्या लिखाणातून झालेला होता.[9] ऑगस्ट कॉम्ट या फ्रेंच पॉझिटिव्हिस्ट तत्वज्ञ–समाज–शास्त्रज्ञाचा प्रभाव स्वतः मिलवरच होता. त्यामुळे साहजिकच तो आगरकरांपर्यंत झिरपला असल्यास नवल नाही. व्यक्तिस्वातंत्र्य परमतसहिष्णुता, स्त्रियांचे हक्क ही मूल्ये अशा प्रकारे पश्चिमेकडून आली. मिलचे स्वातंत्र्यावरील आणि स्त्रियांच्या परवशतेवरील निबंध सुधारणावादी चळवळींना दिशा देण्यात कारणीभूत ठरले. उपयुक्ततावादाचा विचार जीवनाच्या अंगोपांगांपर्यंत पोहोचला. इतका की 'सुधारका'त स्त्रियांना सहजपणे वापरता येईल अशा जोड्यांचे डिझाइन करून पाठवावे अशा अर्थाचे निवेदन प्रसिद्ध झाले.

मिलच्या "Systems of Logic" चा समावेश मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात होता. मात्र स्पेन्सरचा परिचय महाराष्ट्राला विद्यापीठाच्या निरपेक्षपणे झाला. इ. स. १८७७ मधील एका निबंधात जस्टिस तेलंगांनी आपली स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानावर खूप श्रद्धा असल्याचे व म्हणूनच आपण सामाजिक सुधारणांबद्दल कळकळ बाळगीत असल्याचे स्पष्ट केले आहे. [10]

स्पेन्सर हा त्या काळाच्या नवशिक्षित पिढीचा परवलीचा शब्द होता. आज स्पेन्सरचे नाव घेताना सहसा कोणी आढळत नाही. किंबहुना स्पेन्सरच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांत पाश्चात्य तत्त्वज्ञानाची दिशाही बदलली. रसेलने तर स्पेन्सरच्या मृत्यूनंतर अवघ्या अकरा वर्षांनी दिलेल्या स्पेन्सर स्मृती व्याख्यानातच स्पेन्सरची पद्धती ही तत्त्वज्ञानाच्या विकासाला घातक असल्याचे म्हटले.[11] पण स्पेन्सरच्या ह्यातीत मात्र त्याचा अमेरिकेपासून जपानपर्यंत बोलबाला होता.

परंतु भारताच्या दृष्टीने स्पेन्सरचे महत्त्व केवळ एक प्रभावी तत्त्वज्ञ एवढेच नव्हते हे लक्षात ठेवले पाहिजे. हिंदु समाजाच्या सुधारणेसाठी तनमनधनाने झटणाऱ्या मलबारी शेठने हिंदूंच्या सुधारणेसाठी इंग्लंडमध्ये जी बड्या लोकांची कमिटी स्थापन केली होती तिचे स्पेन्सरने सभासद व्हावे म्हणून खटपट केली होती व त्यात त्यांना यश आल्याचेही त्यांनी लिहिले आहे.[12] पं. श्यामजी कृष्ण वर्मा यांनी खुद्द इंग्लंडमध्ये भारतीय स्वातंत्र्याचा पुरस्कार चालविला होता व त्याच्या समर्थनासाठी ते स्पेन्सरच्या मतांचा आधार घेत.[13] वर्मा हे स्पेन्सरने इतके प्रभावीत झाले होते की स्पेन्सरच्या प्रेतसंस्काराच्या वेळीच त्यांनी एक हजार पौंड देऊन स्पेन्सरच्या नावे ऑक्स्फर्ड येथे "स्पेन्सर लेक्चररशिप" स्थापन केली व हिंदी विद्यार्थ्यांना स्पेन्सरच्या नावाने पाच शिष्यवृत्त्या जाहीर केल्या.[14] त्यांच्या "Indian Socialist" या पत्रामागची व "Indian Homerule Society" च्या स्थापनेमागची प्रेरणा मुख्यत्वे स्पेन्सरच होती. एकंदरीत "स्पेन्सरच्या विचारांची छाप इंग्लंड, अमेरिका किंवा इतर पाश्चात्य देश यांतील विद्वानांवर जितकी बसलेली आहे तितकी, किंबहुना त्याहुन थोडी अधिकही आमच्याकडील विद्वान मंडळीवर बसवलेली आढळून येते" असे जे टिळकांनी म्हटले आहे ते अगदी यथार्थ आहे.[15]

आता स्पेन्सरच्या मतांचा महाराष्ट्रात कसा प्रसार झाला यासंबंधी थोडे विवेचन करणे क्रमप्राप्त आहे.

"मनोरंजन" "निबंध चंद्रिका" यात स्पेन्सरचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. "केसरी" पत्रातही "स्पेन्सरमतप्रकाशन" या सदरात स्पेन्सरची "कशीबशी ओळख करून देण्याचा कसाबसा प्रयत्न चालविला होता" (अर्थात् ही गोष्ट आगरकर "केसरी" चे संपादक होते तेव्हाची असणार हे उघड आहे) आर्यभूषणचे

मॅनेजर हरी नारायण गोखले हे "शिक्षणसूत्रे" "शास्त्रसूत्रे" इ. लेखांद्वारा स्पेन्सर-साहेबांचे विचार मांडीत होते. कोल्हापुरातील "ग्रंथमाले" ने स्पेन्सरचे "समाज-शास्त्राचे अध्ययन," "प्रजा विरुद्ध सरकार," "प्रातिनिधिकसत्ताक राज्यपद्धती" इ. भाषांतरीत लेख प्रसिद्ध केले. स्पेन्सरच्या लेखावरून रा. रा. सहस्त्रबुद्धे यांनी "शिक्षणमीमांसा" हे पुस्तक लिहिले. त्याच्या एकापेक्षा जास्त आवृत्त्याही निघाल्या. आगरकरांनी तर नानाविध विषयांवरील आपल्या एकंदर चटकदार लेखांचे धोरण स्पेन्सरसाहेबांच्या तत्वमीमांसेस अनुसरूनच ठेवले होते.[16]

परंतु या झाल्या फुटकळ कृती. संपूर्ण स्पेन्सर मराठीत आणण्याच्या दृष्टीने तेव्हा प्रयत्न झाला. बळवंत गणेश दाभोळकर या उत्साही गृहस्थांनी एक मालाच काढली. या मालेला तेव्हा एक हजार ग्राहक मिळाले होते ही गोष्ट लक्षणीय आहे. चिं. ग. भानू यांनी या मालेतून "Data of Ethics" चे भाषांतर "नीति-शास्त्राची मूलतत्त्वे" या नावे केले "Beneficence" चेभाषांतर धोंडो केशव कर्वे यांनी "परोपकार" या नावाने केले. कर्व्यांनीच The Induction of Ethics" चे "नीतिशास्त्राचे सामान्य सिद्धांत" असे भाषांतर केले. तर "Justice" ला भानू यांनीच "न्यायतत्त्वे" हा मराठी पोशाख चढविला.[17] (तसेच कर्व्यांनीच वा. ब. पटवर्धनांच्या मदतीने हेन्री सिग्विकच्या "The elements of Politics चे भाषांतर केले)

ना. ल. फडके यांनी स्पेन्सरच्या Ethics of Individual Life या कृतीचे "आत्मनीतीची तत्त्वे" हे भाषातंर केले आणि "First Principles" च्या दोन भागांचे अनुक्रमे "अज्ञेयमीमांसा" व "ज्ञेयमीमांसा" अशी भाषांतरे केली. पैकी "अज्ञेयमीमांसा" या ग्रंथाची प्रस्तावना महत्त्वाची आहे. शिवाय त्याला स्पेन्सरचे चरित्र व कठीण शब्दांचा कोश जोडला आहे. इतकेच नव्हे तर मालेच्या वर्गणीदारांची यादीही दिलेली आहे.

फडक्यांच्या "अज्ञेयमीमांसा" आणि "ज्ञेयमीमांसा" या दोन्ही ग्रंथांची परीक्षणे लोकमान्य टिळकांनी केली ती प्रस्तुत विषयाच्या दृष्टीने निश्चित महत्त्वाची आहेत. न्या. रानडे यांच्या फ्रेझरवरून बेतलेल्या मुंबईतील व्याख्यानाचा उल्लेख यापूर्वी केलेला आहेच. त्या व्याख्यानावरही टिळकांनी तीन अग्रलेख लिहले. टिळक व रानडे यांच्यातील मतभेदांचे विवेचन दि. के. बेडेकर यांनी उत्तम रितीने केलेले आहे.[18] प्रार्थना समाजिस्ट–सुधारणावादीय मवाळ या स्कूलच्या विरूद्ध टिळकांचे स्कूल कसे घडत होते हे समजावून घ्यायला फडके–रानडे यांच्यावरील टिळकांचे उपरोक्त लेख प्रकाशदायक आहेत.

"अज्ञेयमीमांसेच्या" प्रस्तावनेत फडक्यांनी स्पेन्सरसाहेबांचे विचार टिळकांना मान्य आहेत असे सांगून "टिळक व आगरकर यांचा काही बाबतीत

मतभेद होता किंवा असेल तर तो स्पेन्सरसाहेबांच्या विचारांच्या याथार्थ्याबद्दल किंवा अयाथार्थ्याबद्दल नव्हे तर प्रस्तुत काळी आणि प्रस्तुत स्थितीत ते आपणास किती व किती प्रमाणात लागू करता येतील यासंबंधी होता किंवा असेल" हे विधान करून टिळकांना चांगलेच अडचणीत आणले. यावर प्रतिक्रिया करणे टिळकांना साहजिकच गरजेचे वाटते.

टिळकांची व्यूहरचना चौहेरी आहे. पहिल्यांदा ते स्पेन्सरचे तत्त्वज्ञ या नात्याने महत्त्व मान्य करतात. त्याला "महातत्त्ववेत्ता" असे संबोधतात. दुसऱ्यांदा स्पेन्सरची मते त्यांना व आगरकरांना मान्य असल्याचा फडक्यांचा दावा स्वीकारतात. मात्र तिसऱ्या बाजूने ते आणि आगरकर यांच्यातील मतभेदाबद्दलचे फडक्यांचे म्हणणे फेटाळून लावतात.[19]

प्रस्तुत काळी व प्रस्तुत स्थितीत स्पेन्सरचे विचार किती व किती प्रमाणात लागू करावयाचे याबद्दल टिळक व आगरकरांचे मतभेद असल्याचे फडके म्हणतात तेव्हा त्यांना स्पेन्सरचे सामाजिक-राजकीय विचार, विशेषतः स्त्रियांचे शिक्षण, हक्क इ. बद्दलचे विचार अभिप्रेत आहेत. अज्ञेयवादी विचार नव्हते हे उघड आहे. टिळकांनी फडक्यांच्या अभिप्रायाला कलाटणी देऊन आपले विवेचन अज्ञेयवादापुरतेच मर्यादित ठेवले आहे.

चौथ्या बाजूने टिळक असे दाखवतात की अज्ञेयवाद हा काही आम्हाला नवीन नाही. आमच्या प्राचीन तत्वज्ञानात अज्ञेयवाद आहे. फरक असेल तर अज्ञेयवादापर्यंत पोहोचण्याच्या स्पेन्सर व आमचे पूर्वज यांच्या पद्धतीमध्ये आहे.[20] इतकेच नव्हे तर आपले प्राचीन तत्त्वज्ञान स्पेन्सरच्या पुढे गेलेले आहे. असे असल्याने स्पेन्सरच्या मागे लागणे म्हणजे " घरचे सोने विसरून जाऊन लोकांच्या रूप्याकरिता ध्यास घेण्यासारखे आहे.[21]

टिळकांच्या मते फडक्यांनी स्पेन्सरच्या विचारांचे भारतीय तत्वज्ञानाशी असलेले साम्य-भेद दाखवायला हवे होते.[22] स्वतः टिळकांनी या ठिकाणी सांख्य, न्याय, वेदांत इ. भारतीय दर्शनांची स्पेन्सरच्या मतांशी तुलना करून त्यांच्यातील सादृश्य दाखविले आहे. परीक्षणाचा समारोप करताना त्यांनी असे आवाहन केले आहे की "एवढ्याने या विषयाकडे कोणाचे लक्ष जाऊन जर अशा प्रकारची अर्वाचीन व प्राचीन तत्त्वज्ञानावरील ग्रंथांची तुलना करून हा विषय तो महाराष्ट्र जनतेपुढे मांडील तर आमच्या श्रमाचे सार्थक झाले असे आम्ही समजू."[23]

टिळकांचे हे आवाहन फार महत्त्वाचे आहे असे मी मानतो. टिळकांना तत्त्वज्ञानाचा कोणत्या प्रकारचा अभ्यास अभिप्रेत होता हे त्यावरून समजते. टिळकांच्या

आवाहनास प्रतिसाद देऊ शकेल इतका समर्थ अभ्यासक त्या काळात फक्त एकच होता आणि तो म्हणजे स्वत: टिळकच. गीतारहस्याच्या निमित्ताने टिळकांनी स्वत:च या आवाहनाला प्रतिसाद दिला. गीतारहस्याची पार्श्वभूमी ही अशी आहे.

गीतारहस्याच्या प्रस्तावनेत टिळकांनी पाश्चात्यांचे डोळे दिपवून टाकणाऱ्या वैज्ञानिक शोधांचा उल्लेख केलेला आहे. तो त्यांनी अगोदर स्पेन्सरवरील मृत्यु-लेखातही केला होता.[24] आधीच पाश्चात्यांचेनवनवीन शोध डोळे दिपवून टाकणारे आणि त्यात स्पेन्सरचे तत्त्वज्ञान या वैज्ञानिक शोधांची दखल घेऊन किंवा या शोधांच्या चौकटीतच मांडलेले. त्यामुळे येथील आधुनिक विद्वानांवर त्याचा परिणाम झाला यात नवल नाही.

टिळकांना हा परिणाम नाहीसा करायचा होता. येथील तात्त्विक परंपरेची जाणीव करून द्यायची होती. त्यासाठी त्यांनी तौलनिक तत्त्वज्ञानपद्धतीचा मोठ्या खुबीने उपयोग केला. संपूर्ण गीतारहस्य तौलनिक अभ्यासपद्धतीचा उत्तम नमुना आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञानातील प्राचीन अर्वाचीन सर्व पंथोपपंथांचे विचार भारतीय तत्त्वज्ञानाच्या भाषेत व चौकटीत मांडून, त्यांची भारतीय तत्वनाज्ञाशी तुलना करून पाश्चात्यांचे तत्वज्ञान आपल्या पोटात घालून भारतीय तत्त्वज्ञान त्यांच्यापेक्षा पुढे कसे जाते याची सिद्धता करण्याचा प्रयत्न टिळकांनी केलेला आहे. गीतारहस्य हा खरोखर अद्वितीय ग्रंथ आहे. गीतारहस्यातील पाश्चात्य ग्रंथांची व तत्त्ववेत्त्यांची नुसती सूची पाहिली तरी त्याचे विश्वकोषीय स्वरूप लक्षात यावे येवढी ती समावेशक आहे. टिळकांना त्यासाठी कायकाय प्रयासाने कोठूनकोठून कोणकोणते ग्रंथ पैदा करावे लागले हे समजावून घ्यायचे असेल तर त्यांनी मंडालेचा तुरुंगवास संपल्यानंतर मायदेशी परतताना बरोबर आणलेल्या पुस्तकांची यादी नुसती चाळली तरी पुरेसे होईल. या यादीत इंग्रजीबरोबर जर्मन व फ्रेंच पुस्तकांचाही समावेश आहे व त्या भाषांच्या व्याकरणग्रंथांचाही समावेश आहे.[25]

गीतारहस्यामुळे काय फायदे झाले असतील ते असोत. त्याबद्दल दुमत होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. एक नुकसान मात्र झाले. एक तर आपल्या तत्त्वज्ञानात सर्वच प्रश्नांना समाधानकारक उत्तरे असल्यामुळे पाश्चात्य तत्वज्ञानाचा अभ्यास करण्याची जी लाट महाराष्ट्रात आलेली होती ती तशीच ओसरली व तौलनिक तत्त्वज्ञानाला प्रतिष्ठा प्राप्त झाली. पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाला हा एक प्रकारचा सेटबॅकच होता. रहस्यानंतर खुद्द रहस्यावरच जी चर्चा महाराष्ट्रात झडली तिचे–(अगदी बापटशास्त्र्यांपासून कोठारीपर्यंत) केंद्र बहुतांशी "शंकराचार्य बरोबर की लोकमान्य बरोबर" हेच असायचे. टिळकांनी पाश्चात्य तत्त्वज्ञाने बरोबर मांडली आहेत किंवा नाही, तसेच त्यांनी पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय तत्त्वज्ञानाशी जी तुलना केलेली आहे ती न्याय्य आहे की नाही असे प्रश्न

कोणी उपस्थितच केले नाहीत. त्यासंबंधीचे सर्व प्रश्न सुटले आहेत असेच जणू गृहीत धरण्यात आले. टिळकांना काही हे अपेक्षित नसणार पण ज्या समाजाला आत्मतुष्टीची मजबूत परंपरा लाभली आहे तेथे दुसरे घडणार तरी काय ?

टिळकांच्या मांडणीची चिकित्सा करण्याचे हे स्थान नाही. परंतु उदाहरणादाखल म्हणून फ्रेंच पॉझिटिव्हिस्ट ऑगस्त कॉम्तचे नाव घेता येईल. कॉम्तने मानवी ज्ञानाच्या विकासाच्या तीन अवस्था मानल्या–Theological, Metaphysical आणि Positive. टिळकांनी भारतीय तत्त्वज्ञानातील आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक या संकल्पनांच्या चौकटीत कॉम्तच्या या विवेचनाची मांडणी केली. परंतु कॉम्तला अभिप्रेत असलेला विकासक्रम टिळकांनी फिरवला व आध्यात्मिक पद्धतीचे श्रेष्ठत्व सांगितले. अर्थात हे टिळक केव्हाही करू शकतात. पण एकदा कॉम्तची मांडणी स्वीकारायची व त्यातील क्रम मात्र नाकारायचा ही विसंगती आहे. कॉम्तची मांडणीच अशी आहे की एकदा ती स्वीकारल्यानंतर तिच्यातील अवस्थाक्रमही स्वीकारावा लागतो. इतिहासार्य राजवाड्यांनी कॉम्तची परिभाषा व मांडणी स्वीकारली व क्रमही स्वीकारला पण रामदासांचे श्रेष्ठत्व प्रतिपादन करण्याच्या भरात त्यांचेही भान सुटले व रामदासांची विचारप्रणाली पॉझिटिव्ह होती असे ते म्हणू लागले. वास्तविक रामदासांची प्रवृत्तिपरता मान्य केली तरी सुद्धा रामदास आध्यात्मिकच राहतात. पॉझिटिव्ह असण्याचा संबंध वैज्ञानिकतेशी आहे. जिथे भारतभर कोठेच विज्ञानाचा प्रादुर्भाव झालेला नव्हता तिथे ते रामदासांमध्ये कोठून यावे. ज्ञानकोशकार केतकरांनी मात्र कॉम्तचा स्वीकार करताना अशी गफलत होऊ दिलेली नाही. नवशिक्षित सुधारणावादी पंथाने ब्रिटिश तत्त्ववेत्त्यांशी जवळीक साधली होती. तिला उतारा टिळकांना शार्मण्यदेशीय पंडितांमध्ये सापडला. "मोक्षमुल्लरभट्टांचा वेदांत" या लेखांमध्ये टिळकांनी एतद्देशीय ब्रिटिश शाळेतल्या विद्वानांना डोळ्यात घालण्यासाठी जर्मन पंडितांचे अंजन देऊ केलेले आहे.[26]

त्या काळात टिळकांचे पूर्वपक्षी उपयुक्ततावादी, अनुभववादी व अज्ञेयवादी आहेत. जडवादी व निरिश्वरवादी नाहीत, हे लक्षात ठेवले पाहिजे. मार्क्सवादाच्या रूपाने ही विचारधारा भारतात यायला आणखी थोडी वाट पाहावी लागणार होती. तरीसुद्धा मार्क्सवादाच्या पहिल्या पिढीचे स्फूर्तिस्थान टिळक होते ही गोष्ट काही म्हटले तरी थोडी चक्रावून टाकणारी आहे. इतिहासाचार्य राजवाड्यांच्या बाबतीत त्यांना मार्क्स वाचायला मिळाला असता तर, मार्क्स हा कॉम्तच्या पुढचा टप्पा असल्याने ते मार्क्सवादी झाले असते असे कॉ. डांगे यांनी भारतीय विवाहसंस्थेच्या इतिहासाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे ते पटत नाही. खुद्द मार्क्सला कॉम्तचा बिलक्षण तिटकारा होता आणि राजवाड्यांना आर्य संस्कृतीचा विलक्षण अभिमान असल्याने ते आहिताग्नी राजवाड्यांप्रमाणे निरशेकडे वळण्याचाच अधिक संभव होता.

महाराष्ट्रातील पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा विचार करताना द्विकेंद्रात्मक लंबवर्तुळाच्या प्रारूपाने (Models) चांगलीच मदत होईल असे मला वाटते. यापैकी एका बिंदूचा म्हणजे स्पेन्सरचा विचार आपण केलेला आहे. दुसरा बिंदू म्हणजे नित्शेचा आहे. स्पेन्सरचे समर्थक म्हणून जसे आगरकर उभे होते तसेच नित्शेचे पुरस्कर्ते आहेत आहिताग्नी शं. रा. राजवाडे.

आहिताग्नींचा समावेश टिळकांपेक्षाही कडव्या असलेल्या टिळकवाद्यांमध्ये करावा लागतो. स्पेन्सरवरील उतारा म्हणून शोपेनहॉवर किंवा मॅक्समुल्लर हे वेदान्ताचे समर्थक एकतर राजवाडयांना खूपच मिळमिळीत वाटलेले असणार व दुसरे म्हणजे राजवाडे हे टिळकांप्रमाणे वेदांती नसून पूर्वमीमांसक होते.

राजवाडयांचा सात्त्विक पिंड डेक्कन कॉलेजमधील प्रोफेसर एम. डब्यू बेन यांच्या विचारावर पोसला होता. बेन हे मिल व स्पेन्सर यांचे कडवे विरोधक होते. साहजिकच ते स्त्रीशिक्षण, उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य अशा गोष्टींच्याही विरोधात होते. मिल पिता-पुत्रांबद्दल ते म्हणत 'बापलेकांची जोडी सारखीच तिरस्करणीय. [27] हर्बर्ट स्पेन्सरच्या बाबतीत तर हर्बर्ट या नावाचाही मला तीटकारा आहे असे ते म्हणत. [28] "जीवशास्त्रात काय किंवा मानसशास्त्रात काय, स्पेन्सर हा सारखाच नासका गोळा होता" असे बेनचे मत होते. [29] एकदरीत राजवाडयांना योग्यच गुरू भेटला म्हणायचे. ते लिहितात, "पण याच स्पेन्सरबद्दल आमच्या अर्धवट सुशिक्षित सुधारकांना केवढा आदर ? ते त्याच्या ग्रंथांची मोठया भक्तिभावाने भाषांतरे करण्यास प्रवृत्त झालेले कोणी पाहिले नाही काय ?" [30] प्रोफेसर बेन यांची एकंदरीत सर्वच मते चमत्कारीक व विक्षिप्त वाटावीत अशी होती. सॉक्रेटीसला मृत्युदड दिला हे त्यांना योग्य वाटे. ते ॲरिस्टॉटलची चतुर्विध कारणांची संकल्पना अर्थशास्त्राला लावून दाखवीत. राजवाडयांची अनेक व्याख्याने बेनच्या असल्या विचारांवरच आधारित आहेत. "षददर्शन समन्वय", "गीता भाष्य", "नासदीयसूक्तभाष्य" इ. सारख्या राजवाडयांच्या कृतीपासून बेनच्या प्रभावखुणा पदोपदी स्पष्ट दिसतात.

मात्र नित्शेंचा परिचय राजवाडयांना झाला होता तो बेनमार्फत नव्हे. किंबहुना बेनकडून नित्शेचे नावही कधी निघाले नव्हते. नित्शे त्यांना ज्ञात झाला तो टिळकांच्या "गीतारहस्यातून". [31] मग मात्र त्यांनी समग्र नित्शे वाचला आणि बेन आणि नित्शे यांच्यात साम्य असल्याचे त्यांना अढळून आले. [32] या दोघांचे सॉक्रेटीस व प्लेटो यांच्याविरुद्ध एक मत व दोघेही ॲरिस्टॉटलचे परम भक्त. दोघे ख्रिस्ती धर्माचे पक्के द्वेष्टे व दोघांना बौद्ध धर्माविरुद्ध मनुस्मृतीविषयी महान – आदर. [33] शक्ती (Power) ही संकल्पना नित्शे व बेन या दोघांनाही सारखीच

केंद्रवर्ती होती. नित्शे पुढे नाझी फॅसिझमला आधारभूत ठरला. राजवाडेही फॅसिस्ट विचारसरणीचे पक्के पुरस्कर्ते होते. राम-कृष्ण-शिवाजी ही सारी मंडळी फॅसिस्ट होती असे त्यांना वाटे.

या सर्व गोष्टींचा टिळकांशी कोठे संबंध पोहचतो असे कोणी विचारील. पाश्चात्यांचा उदारमतवाद व व्यक्तिस्वातंत्र्यावर अधिष्ठित असलेला नवमतप्रवाह टिळकांना मानवत नव्हता हे त्यांच्या हयातीतच तद्भव व तत्सम भारतीय विचारांना (आगरकरादिकांच्या) विरोध करून त्यांनी दाखवून दिले होते. आता नंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर दोनच पर्याय राहीले होते. पहिला म्हणजे रशियन साम्यवादाचा व दुसरा म्हणजे जर्मन-इटालियन फॅसिझमचा. टिळकांनी यातले काय पसंत केले असते हा काही येथील प्रस्तुत विषय नाही. [34] परंतु टिळकांच्या निकटवर्ती अनुयायांपैकी व त्यांना मानणाऱ्यांपैकी काहींचा कल फॅसिझमकडे होता तसेच त्यात न. चिं केळकरांसारख्या महत्त्वाच्या व्यक्तींचा सामावेश होता हे लक्षात ठेवले पाहिजे. १९३६ सालच्या टिळक पुण्यतिथीला दिलेल्या व्याख्यानात केळकरांनी "कम्युनिझम की फॅसिझम याला उत्तर देताना टिळकांचे संस्कारविशेष, स्वभाव व तत्त्वज्ञान या तीनही दृष्टींनी कम्युनिझमपेक्षा फॅसिझम त्यांना अधिक पसंत पडला असता" असे प्रतिपादन करून "जर्मन तत्त्ववेत्ता नित्शे याच्या तत्त्वज्ञानावर टिळकांचा फॅसिझम अधिष्ठित झाला असता" असे सांगितले [35] गीतारहस्यात टिळकांनी आठ ठिकाणी नित्शेचे आधार घेतले आहेत. लोकशाही, स्त्री-पुरुष समता इ. बाबतीत टिळकांची मते नित्शेसारखीच होती. अशा तऱ्हेचे युक्तिवादही केळकरांनी आपल्या मताच्या पुष्टयर्थ केले. [36]

केळकरांच्या या मताचा जोरदार प्रतिवाद खाजगी पत्रातून व "मौजे" च्या दिवाळी अंकातून ग. त्र्यं. माडखोलकरांनी केला. [37] टिळकांचे धोरण व तत्त्वज्ञान यांचा विचार केला असता ते कम्युनिस्ट झाले असते असे माडखोलकरांना वाटत होते. [38]

माडखोलकरांना उत्तर देताना केळकरांनी गांधींच्या असहकारतेच्या संदर्भात झालेल्या टिळकांच्या अनुयायांमधील मतभेदाचा दाखला दिला व डॉ. वेलकर यांची एक आठवणही उद्धृत केली आणि या आठवणीच्या आधारे टिळकांना वेल्फेअर स्टेट हवे होते हा आपल्या मूळच्या व्याख्यानात नसलेला तिसरा निष्कर्ष काढला. [39] एकंदरीत या पत्रात केळकरांची बरीच त्रेधा उडालेली दिसते.

विवेचनाच्या ओघात आपण बरेच पुढे गेलेलो आहोत. थोडे मागे वळून प्रार्थनासमाजाच्या व आगरकर संप्रदायाच्या दोन विचारवंतांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. ते म्हणजे अनुक्रमे विठ्ठल रामजी शिंदे आणि वा. म जोशी. शिंद्यांनी त्यांचा मिल व स्पेन्सर यांच्या विचाराशी महाविद्यालयीन अभ्यासात कसा परिचय झाला आणि विशेषतः स्पेन्सरच्या विचारात त्यांचे सर्वच शिक्षक

कसे वाहत गेले होते याचे वर्णन केले आहे. परंतु स्पेन्सरचा अज्ञेयवाद शिंद्यांचे समाधान करू शकला नाही. शिंद्यांना मॅक्समुल्लरचे तत्त्वज्ञान अधिक समाधानकारक वाटलें. पुढे त्यांनी इंग्लंडला जाऊन धर्मांचा तौलनिक अभ्यासही केला. शिंदे हे चांगले अभ्यासक तर होतेच परंतु अव्वल दर्जाचे चिंतकही होते. तरीही त्यांना पुणे येथे भरलेल्या भारतीय तत्त्वज्ञान परिषदेत निमंत्रण नव्हते. याबद्दल बडोद्याहून निघणाऱ्या "जागृती" या ब्राह्मणेतर पत्राचे संपादक भगवंतराव पाळेकर यांनी आश्चर्य व नापसंती व्यक्त केली होती. [41]

प्रोफेसर बेनला सॉक्रेटीसबद्दल काहीही वाटत असो वामन मल्हार जोशींना मात्र सॉक्रेटीसबद्दल परम आदर होता. सॉक्रेटीस हा त्यांचा आदर्श होता. सॉक्रेटीसचा अभ्यास कृष्णशास्त्री चिपळूणकरांपासून सुरू झालेला होता. मध्यंतरी इतिहासाचार्य राजवाड्यांनी "भाषांतरातून" प्लेटोच्या "रिपब्लिक" सारखा संवाद अनुवादित केला होता. वामन मल्हारांनी "सॉक्रेटीसचे संवाद" हे पुस्तक लिहिले. त्याला विद्वत्तापूर्ण प्रस्तावनाही जोडली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सॉक्रेटिस बुद्धिवादी, उपयुक्ततावादी व अज्ञेयवादी होता. साहजिकच जोशी मिल–स्पेन्सर–आगरकर ह्या परंपरेचे मूळ सॉक्रेटिसपर्यंत नेऊन भिडवतात. "नीतिशास्त्र प्रवेश" या ग्रंथावरून व अनेक निबंधांवरून जोशींच्या विचारशक्तीचा आवाका ध्यानात यावा. गीतारहस्याबर त्यांनी केलेल्या टीकेवरून त्यांची स्वतंत्र प्रज्ञाही दिसून येते. त्यांना विल्यम जेम्सचा सत्ताविषयक "प्रॅग्मॅटिक" विचार मान्य नव्हता. आत्म्याचे अमरत्व मानणे हे नीतीशास्त्रासाठी आवश्यक असल्याचे कांटचे मत त्यांना मान्य होते. वा. म. जोशींची सौंदर्यशास्त्रातील मतेही महत्त्वाची आहेत.

महाराष्ट्रातील तत्वज्ञानाच्या अभ्यासाचा विचार करताना बडोद्याहून सयाजीराव गायकवाडांच्या साहाय्याने प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांचाही उल्लेख व्हायला हवा. नुकताच सॉक्रेटीसच्या भाषांतराचा मुद्दा आलेला आहे. बडोद्यातून प्रो. दत्तात्रय गोविंद केतकर यांनी सयाजी ग्रंथमालेतून पाश्चात्य तत्वज्ञान या मालिकेत सॉक्रेटिसपूर्व ग्रीक तत्त्वज्ञानावर "थेल्स व त्यांचे शिष्य" हे पहिले आणि "सॉक्रेटिस" हे दुसरे अशी दोन पुष्पे छापली. प्रा. गो. चि. भाटे यांच्या "शंकराचार्य आणि कांट" व "तीन तत्त्वज्ञानी' या पुस्तकांचा उल्लेखही केला पाहिजे

१९२० ते १९३० हे दशक महाराष्ट्राच्या इतिहासात एक महत्त्वाचे दशक आहे. टिळक व शाहू छत्रपती हे महाराष्ट्रातील दोन प्रवाहांचे नेतृत्व करणारे नेते कालवश झालेले आहेत. गांधीचे नेतृत्व स्वीकारायचे की नाही याबद्दल मतभेद आहेत. साम्यवादी चळवळ व आंबेडकरांची दलित चळवळ नव्याने दाखल होऊ पाहत आहेत. एकंदरीत वातावरण "चाचपडणे' या शब्दाने वर्णन करता येईल असे आहे. प्रारंभीच्या काळात आंबेडकरांचा ब्राह्मणेतर चळवळीशी संबंध असला

तरी भारतीय राजकारणाच्या स्तरावर त्यांनी रानडे–गोखले यांची परंपरा सांगितली ती बुद्धिवादाची होती. आंबेडकरांनी सांगितलेला उदारमतवाद–लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य इ. विचार महाराष्ट्राला तेव्हा नवे असले तरी या पाश्चिमात्य विचारांना त्यांना एतद्देशीय बौद्ध धर्माची बैठक देण्याचा प्रयत्न केला आणि विशेष म्हणजे कायद्याच्या तत्त्वज्ञानाच्या सखोल अभ्यासाची जोड दिली हे त्यांचे योगदानच मानावे लागते.

मार्क्सवाद येथे आला तेव्हा त्याचा मुख्य भर मुख्यत्वे चळवळीवर असणार हे उघड आहे. प्रारंभी मार्क्सवाद्यांना मार्क्स–एंजल्सचे साहित्य मिळविण्यासाठी खूप आटापिटा करावा लागला. तरीदेखील मार्क्सच्या पद्धतीने विचार करण्याचे प्रयत्न येथे झाले नाहीतच असे नाही. विशेषत: मार्क्सवाद्यांपासून फुटून निघालेल्या रॉयवाद्यांचा प्रत्यक्ष चळवळीपेक्षा विचारमंथनावर अधिक भर असल्यामुळे त्यांचे योगदान लक्षणीय म्हणावे असे झाले आहे. या संदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचें नाव अग्रगण्य आहे.

निबंधात काही उल्लेख राहून गेले असतील. परंतु निबंध मर्यादित करता येईल तेवढा करण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. हा एक धावता आढावा आहे. यावर स्वतंत्रपणे काम करता येणे शक्य आहे.

तत्त्वज्ञान विभाग
पुणे विद्यापीठ
पुणे ४११००७

– सदानंद मोरे

**ऋणनिर्देश**

- हा निबंध लिहिताना डॉ. श्री. मा. भावे यांच्याशी झालेल्या चर्चेचा उपयोग झालेला आहे. त्यांचा मी आभारी आहे.
- हा निबंध " महाराष्ट्रातील सामाजिकशास्त्रांचा अभ्यास व विकास " या विषयावरील दि. १७–१०–८७ रोजी भरलेल्या चर्चासत्रात सादर केला होता.

(संदर्भ व टीपा पुढील पानावर)

## संदर्भ व टीपा

१) समग्र टिळक, खंड ५, पृ. ५२६
२) तत्रैव, पृ. ५२६
३) Collected Works of Bhandarkar R.G. V. 1, P. 62
४) भांडारकर रा. गो. प्रपचप्रलपित, पृ. २६८
५) समग्र टिळक खंड ५. पृ. ५२९ – ३९
६) Ranade Miscellaneous Writing, P. 65
७) Lederle matthaw, philosophical Trends in modern maharashtra, P. 82
८) भांडारकर, रा. गो. धर्मपर लेख व व्याख्याने
९) Lederle उक्त पृ. २३८
१०) Telang K. T. Selected writings and speeches, V. 1 P. 199
११) Russell B., mysticism and Logic, P. 98
१२) फडके ना. ल. अज्ञेयमीमांसा, प्रस्तावना
१३) समग्र टिळक, खंड ५, पृ. ९४९
१४) तत्रैव, पृ. ९४९
१५) तत्रैव पृ. ९४१
१६) फडके ना. ल. उक्त, प्रस्तावना
१७) तत्रैव
१८) सरदार गं. बा. व इतर (सं) महाराष्ट्र जीवन, खंड १, पृ. २६३ – ७१
१९) समग्र टिळक, खंड ५, पृ. ५४१
२०) तत्रैव पृ. ५४८
२१) तत्रैव पृ. ५४१
२२) तत्रैव पृ. ५५२
२३) तत्रैव पृ. ५५२
२४) तत्रैव पृ. ९४२
२५) Bapat, S. V. Remnisciences and Anecdotes of Lokamanya Tilak P. 199
२६) समग्र टिळक, खंड ५, पृ. ५२३ – ८
२७) अहिताग्नि राजवाडे आत्मवृत्त, पृ. ३०७
२८) तत्रैव, पृ. २९७
२९) तत्रैव पृ. २९७

३०) तत्रैव पृ. २९७
३१) तत्रैव पृ. २९७
३२) तत्रैव पृ. २९७
३३) तत्रैव पृ. २९७
३४) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मताप्रमाणे टिळकांनी गांधींचा मार्ग पत्करला असता.
३५) समग्र केळकर, खंड ४, पृ. ३९५
३६) तत्रैव, पृ. ३९७
३७) मोटे हरिभाऊ., विश्रब्द शारदा, खंड १, पृ. ४९१
३८) तत्रैव, पृ. ४९२
३९) तत्रैव, पृ. ५४०
४०) शिंदे वि. रा., माझ्या, आठवणी व अनुभव, पृ. १०९

◈◈